म.टा. पु.पा.नं. 1

# वसई विजयोत्सव उत्साहात

म. टा. वृत्तसेवा, वसई

वसईच्या किल्ल्यात वसई विजयोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सलग तीन दिवस चाललेल्या या उत्सवाची सांगता रविवारी रात्री झाली. या दरम्यान वसईकरांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचा, शस्त्र प्रदर्शन, किल्लेबांधणी, बालजत्रा यांचा अनुभव घेतला. हजारो किल्लाप्रेमी या विजयोत्सवात सहभागी झाल्याचे दिसून आले.

वसई-विरार शहर महानगरपालिकेतर्फे आयोजित वसई तालुका कला-क्रीडा विकास मंडळ व वसई विजय स्मारक समिती यांच्या सहकार्याने २८५वा वसई विजयोत्सव जंजिरे वसई किल्ला येथे शुक्रवार ते रविवार या कालावधीत पार पडला. बालजत्रा, पारंपरिक खाद्य महोत्सव, किल्ले बांधणी, रांगोळी, शिवकालीन शिवराई नाणी, ऐतिहासिक वस्तू व दस्तऐवज, शस्त्र प्रदर्शन व 'अराऊंड द वर्ड लाइट शो' या सर्व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाचे विशेष आकर्षण होते



ते म्हणजे वसई किल्ला सफारीचे. या अभ्यास मोहिमेत एकूण तब्बल २५०हून अधिक दुर्गमित्रांनी सहभाग नोंदवला. यावेळी किल्ल्यात ऐतिहासिक शस्त्र प्रदर्शनास भेट देऊन मार्गदर्शन संवादसत्र शिबीर पूर्ण केले. वसई किल्ल्यातील वास्तुविशेषांची सविस्तर माहिती देण्यासाठी इतिहास अभ्यासक श्रीदत्त राऊत उपस्थित होते. यावेळी सहभागींनी चिमाजी अप्पा स्मारक, डॉमिनिकन चर्च, श्री वज्रेश्वरी मंदिर, सेनेट हाऊस, श्री नागेश्वर मंदिर, बालेकिल्ला, नगरपालिका इमारत, न्यायालय, साखर कारखाना, जोसेफ चर्च, बालेकिल्ला, शिलालेख, रणमंडळ आदी २०हून अधिक ऐतिहासिक वास्तूंची माहिती घेतली. तब्बल पाच तास सुरू असलेल्या या इतिहास मार्गदर्शन मोहिमेत मुंबई, दिवा, वसई, पालघर, ठाणे, डोंबिवली, वाडा येथील दुर्गमित्रांना जंजिरे वसईच्या वास्तुवैभव इतिहासाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

वसईच्या पर्यटनातील महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे वसई किल्ला. त्यामुळे पर्यटनवाढीसाठी नक्कीच प्रयत्न करणार आहे, असे पालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार यांनी सांगितले. आमदार हितेंद्र ठाकूर यांनी वसई किल्ल्याच्या विकासासाठी विविध मार्गांनी प्रयत्न करणार असल्याचे नमूद केले. या विजयोत्सवात वसईतील विविध समाजांच्या पारंपरिक खाद्यपदार्थांचे फेस्टिव्हल आयोजित केले होते. तसेच चौरंग प्रस्तुत अशोक हांडेनिर्मित आझादी ७५ या कार्यक्रमात २००हून अधिक कलाकारांनी कला सादर केली. भार्गव शेलार शिवगर्जना तालीम यांच्यातर्फे मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिके देण्यात आली. यामध्ये महिलांनी सहभाग नोंदवला होता.

सकाळ पु.पा.नं. ४

# बाजार समितीची निवड बिनविरोध

## सभापतिपदी अशोक कोलासो; उपसभापतिपदी पांडुरंग पाटील

विरार, ता. ८ (बातमीदार) : वसई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत बहुजन विकास आघाडीने आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली १७ पैकी १६ जागा जिंकून दणदणीत यश मिळवले होते. समितीच्या सभापतिपदी अशोक कोलासो आणि उपसभापतिपदी पांडुरंग पाटील यांची आज (ता. ८) बिनविरोध निवड करण्यात आली.



विरार : अशोक कोलासो आणि पांडुरंग पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

सुहास पवार यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. या वेळी सभापतिपदी निवड झाल्यावर बोलताना अशोक कोलासो यांनी सांगितले, की उत्पन्न बाजार समितीला चांगले दिवस आणण्यासाठी प्रयत्न करणार आहे. दोन एकर जागा विकत घेऊन मार्केट तयार करण्यावर आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणार आहे. तसेच उत्पन्नवाढीसाठी प्रयत्न करणार आहे. तिन्ही आमदार सहकार्य करणार, असे आश्वासन हितेंद्र ठाकूर यांनी दिले असल्याचे कोलासो यांनी सांगितले.

माजी आमदार डॉमनिक घोन्सालविस, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बबन नाईक, माजी महापौर नारायण मानकर, अशोक पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.



Scanned with CamScanner

लोकमत पृ. पा. क्रं. 1

1

## वैतरणा, शिरगाव खाडीत बेकायदा वाळू उपशावर कारवाई

**वसई :** वैतरणा व शिरगाव खाडीत सुरू असलेल्या बेकायदा वाळू उपशावर वसईच्या महसूल विभागाने शनिवारी कारवाई केली आहे. या कारवाईत आठ बोटी व आठ सक्शन पंप यंत्र नष्ट करण्यात आले आहेत.

वैतरणा नदी परिसरात बेकायदेशीर वाळू उपसा करण्यावर बंदी असतानाही छुप्या मार्गाने वाळू उपसा सुरूच होता. यामुळे



पर्यावरणालाही याचा धोका निर्माण झाला होता. या सुरू असलेल्या गैरप्रकाराची माहिती वसईचे प्रांताधिकारी शेखर घाडगे व तहसीलदार अविनाश कोष्टी व त्यांच्या पथकाला मिळाल्यानंतर शनिवारी पोलिसांच्या मदतीने वैतरणा व शिरगाव खाडीत धाड टाकली होती. यात वैतरणा खाडीत वाळूचा उपसा करणाऱ्या तीन बोटी, एक सक्शन पंप जप्त व शिरगाव खाडीत पाच बोटी आणि सात सक्शन पंप स्फोटकाद्वारे नष्ट करण्यात आले आहेत. या झालेल्या कारवाईमुळे वाळूमाफियांचे धाबे दणाणले आहे.



## भूमिगत विद्युतवाहिन्या केवळ अर्धा फुटावर

### विरार कोफराड येथील प्रकार; अपघाताचा धोका

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई:** वसई, विरार शहरात पथदिव्यांसाठी टाकण्यात येणाऱ्या भूमिगत विद्युतवाहिन्या या केवळ अर्धा फूट चरा खणून टाकल्या जात आहेत. विरारच्या कोफराड तलावाजवळसुद्धा अशाच प्रकारे वाहिन्या अंथरण्यात आल्या आहेत. यामुळे या वाहिन्यांचा धोका निर्माण होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

विरार येथे कोफराड तलावाचे सुशोभीकरण व नूतनीकरण करण्याचे काम सुरू आहे. त्यात तलावाच्या चारही बाजूस विद्युत दिवे उभारण्यासाठी काम उभे केले जात आहेत. त्याला वीजपुरवठा करण्यासाठी तलावाभोवती भूमिगत वीजवाहिन्या टाकल्या जात आहे. सदर काम करत असताना फक्त अर्धा फूट चरा खणून वाहिनी टाकली जात आहेत हे अतिशय धोकादायक असल्याचे आम आदमी पार्टीचे जॉन परेरा यांनी सांगितले आहे. विद्युत अधिनियम कायद्याअंतर्गत भूमिगत केबलच्या जमिनीपासून किमान तीन फूट खोलीवर खणून केबल टाकली गेली पाहिजे, याशिवाय त्यावर सी आकाराचे ब्लॉक सुरक्षा कवच टाकले गेले पाहिजे, परंतु पालिकेच्या ठेकेदाराने केवळ अर्धा फूट चरा मारून या वाहिन्या टाकल्या जात आहेत. रस्त्यावर अधूनमधून खड्डे पडतात तर काही वेळा अशा वाहिन्या वरती येतात. त्यामुळे भविष्यात विजेचा धक्का लागून एखादी दुर्घटना होण्याची शक्यता असल्याचे परेरा यांनी सांगितले आहे. विरारमध्ये राहणाऱ्या तनिष्का कांबळे या १५ वर्षीय शाळकरी मुलीला १६ ऑगस्ट रोजी महावितरणाच्या भूमिगत वीजवाहक तारेचा धक्का लागला होता. त्यात तिचा मृत्यू झाला. आतासुद्धा केवळ वरच्यावर विद्युत वाहिन्या टाकल्या जात आहेत. त्यामुळे पुन्हा अशा घटना घडण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

3



## इलेक्ट्रिक सिगारेटसह तरुणास अटक

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मीरा रोड :** मीरा रोडच्या शांती शॉपिंग सेंटरमधील गाळ्यातून पोलिसांनी इलेक्ट्रिक सिगारेटच्या साठ्यासह एकास अटक केली आहे. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिसांच्या अमली पदार्थविरोधी शाखेचे पोलिस निरीक्षक अमर मराठे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने मीरा रोडच्या शांती शॉपिंग सेंटरमधील गाळा क्रमांक ४० वर कारवाई केली.

गाळ्यातून बंदी असलेली इलेक्ट्रिक सिगारेट विक्री केली जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर मराठे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक अमोल आंबवणेंसह अजय सपकाळ, डी. एस. इंगळे, पी. डी. पाटील, व्ही. ए. घरबुडे यांच्या पथकाने छापा टाकला. त्या गाळ्यात असलेल्या रशीद अमजद खान (२३, रा. रेडियम सोसायटी, रेल्वे समांतर मार्ग, नयानगर, मीरा रोड) याच्याकडे चौकशी करून झडती घेतली असता, १४ हजारांचे १४ इलेक्ट्रिक सिगारेट सापडले. त्याच्याकडे सिगारेट कुठून आणल्याची चौकशी केली असता, त्याने शेजारीच असलेल्या वन स्टॉप म्युझिक शॉप दुकानातील वाहिद व इसा इब्राहीम शेख (रा. रेडियम सोसायटी) यांनी विक्रीसाठी दिल्या सांगितले. पोलिसांनी त्या दुकाना तपासणी केली असता, काही आढळ आले नाही. याप्रकरणी नयान पोलिस ठाण्यात रशिदवर ६ मे रो गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



Scanned with CamScanner

पुण्यनगरी पा. नं. 5

# मार्च महिन्यात राज्यातून २२०० मुली गायब

## राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा चाकणकर यांची माहिती

**मुंबई** : राज्यात मार्च महिन्यात २२०० मुली बेपत्ता झाल्या असून रोज सरासरी ७० तरुणी बेपत्ता होत आहेत. गृहमंत्रालयाने यामध्ये लक्ष द्यावे, अशी सूचना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी दिली आहे.



याबाबत माध्यमांशी संवाद साधताना चाकणकर म्हणाल्या, मार्च महिन्यात बेपत्ता तरुणींमध्ये सर्वाधिक १८ ते २० वयोगटातील मुलींचा समावेश आहे. तर जानेवारी महिन्यात १६० आणि फेब्रुवारी महिन्यात ११० मुली बेपत्ता झाल्याची नोंद आहे. बेपत्ता झालेली मुलगी जर अल्पवयीन असेल तर पोलीस अपहरणाची नोंद करतात. तसेच मुलगी अल्पवयीन असल्याने तिची ओळख जाहीर होणार नाही, या हेतूने पोलिसांच्या संकेतस्थळावर याची स्वतंत्र नोंद केली जात नाही; परंतु सज्ञान मुलींच्या बेपत्ता झाल्याची नोंद मात्र पोलिसांच्या संकेतस्थळावर केली जाते. धक्कादायक म्हणजे अल्पवयीन मुलींना पळवून नेऊन लैंगिक अत्याचार झालेल्या मुलींची संख्या अधिक असल्याचेदेखील समोर आले आहे. मिसिंग सेलने याबाबत कारणे शोधून उपाययोजना करण्याची गरज असल्याची प्रतिक्रिया चाकणकर यांनी दिली आहे.

शहरांच्या तुलनेत ग्रामीण भागातून मुली बेपत्ता होण्याचे प्रमाण अधिक असल्याचे आकडेवारीतून समोर आले आहे. ज्यात मार्च महिन्याची आकडेवारी पाहिली असता, पुणे २२८, नाशिक १६१, कोल्हापूर ११४, ठाणे १३३, अहमदनगर १०१, जळगाव ८१, सांगली ८२, यवतमाळ ७४ युवती बेपत्ता झाल्याची नोंद आहे. तर हिंगोली ०३, सिंधूदुर्ग ०३, रत्नागिरी १२, नंदूरबार १४, भंडारा येथून १६ मुली बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली आहे.

### विषय मांडण्याची पद्धत चुकीची – चित्रा वाघ

महाराष्ट्र असो की अन्य कुठले राज्य, मुली-महिलांचे बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढत असेल तर ते चिंताजनकच आहे, पण हा विषय अशा थाटात मांडला जणू सरकार बदलले आणि मुली बेपत्ता व्हायला लागल्या, असे प्रत्युत्तर भाजपच्या महिला अध्यक्षा चित्रा वाघ यांनी महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांना दिले आहे. महाराष्ट्रात दरवर्षी सरासरी चार हजार मुली आणि ६४ हजार महिला बेपत्ता होतात. महाविकास आघाडीचे सरकार आले तरी २०२० मध्ये ४,५१७ मुली आणि ६३,२५२ महिला बेपत्ता झाल्या. २०२१ मध्ये ३,९३७ मुली आणि ६०,४३५ महिला बेपत्ता झाल्या. मुली बेपत्ता झाल्याच्या प्रकरणात सरासरी ९० टक्के प्रकरणात डिटेक्शन होते, तर महिलांच्या बाबतीत ७५ टक्के डिटेक्शन होते.

लोकसत्ता पृ. क्र. १

# खैर तस्करावर वन विभागाची कारवाई

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई** : वसई पूर्वेच्या मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर सकवार येथे छुप्या मार्गाने होणाऱ्या खैर तस्करीवर भाताने वन विभागाने कारवाई केली आहे. यात सुमारे १४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर भाताने परिसरात ६ मेच्या मध्यरात्रीनंतर साधारण एक ते दोन वाजेदरम्यान भाताणे वन विभाग मोबाइल स्कॉड गस्त घालत होते. याचदरम्यान सकवार भागात मुंबईच्या दिशेने जाणारा ट्रक संशयास्पद आढळून आला. वन विभागाच्या पथकाने ट्रकचा पाठलाग करून हा ट्रक अडविला यावेळी चप्पल तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या आड खैराची तस्करी होत असल्याचे उघड झाले. ९.०४७ घनमीटर सुमारे १४ लाख रुपये किमतीचे खैराचे लाकूड जप्त करण्यात आले आहे. ट्रक हा गुजरात राज्यातून आला असून तो पनवेलकडे जाणार होता. वन विभागाने चालकाला ट्रकसह ताब्यात घेण्यात आले असून साधारण २८ लाखांचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती दिली आहे.

मुंबई



Scanned with CamScanner

सामना पान नं. १

## धक्कादायक! मिंधे सरकार सपशेल फेल

# महाराष्ट्रात तीन महिन्यांत ५००० मुली बेपत्ता

मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी) - भाजपचे सरकार असलेल्या गुजरातमध्ये महिला असुरक्षित आहेत, तशीच परिस्थिती महाराष्ट्रातही असल्याचे दिसून आले आहे. मिंधे सरकारच्या काळात राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे. राज्यातून रोज १८ ते २५ वयोगटातील सरासरी ७० महिला बेपत्ता होत आहेत. गेल्या तीन महिन्यांत तब्बल साडेपाच हजारांपेक्षा जास्त मुली गायब झाल्या आहेत. राज्य पोलिसांकडून महिला आयोगाला दिलेल्या अहवालात ही आकडेवारी देण्यात आली आहे.

राज्यात महिलांसंदर्भातील गुन्हे व संबंधित बाबींचा अहवाल दर तीन महिन्यांनी पोलीस प्रशासनाकडून राज्य महिला आयोगाला दिला जातो. जानेवारी, फेब्रुवारी, मार्च अशा तीन महिन्यांचा अहवाल आयोगाला नुकताच सादर झाला. त्यात मुली आणि महिला बेपत्ता होण्याच्या घटनांचा आकडा मोठा आणि चिंताजनक आहे. मुली आणि महिलांना फूस लावून पळवून नेण्याचे प्रकार अलीकडच्या काळात वाढल्याने ते रोखण्याचे आव्हान पोलीस दलासमोर उभे राहिले आहे. बेपत्ता झालेल्या महिला आणि मुलींचा शोध न लागणे ही बाबही गंभीर असल्याचे मत

▪ पान ८



| महिना | बेपत्ता मुली |
|---|---|
| जानेवारी | १६०० |
| फेब्रुवारी | १८१० |
| मार्च | २२०० |

**सर्वाधिक मुली**

*पुण्याच्या ग्रामीण भागातल्या बेपत्ता झालेल्या मुली आणि महिला या सर्वाधिक पुणे येथील आहेत. मार्च महिन्याची आकडेवारी पाहिली तर पुण्यातून २२५८ मुली बेपत्ता झाल्या आहेत. त्यानंतर नाशिक १६१, कोल्हापूर ११४, ठाणे १३३, नगर १०१, जळगाव ८१ तर सांगलीतून ८२ मुली अचानक बेपत्ता झाल्या आहेत. ग्रामीण भागांतील मुलींचे प्रमाण यात अधिक आहे.*

▪ *राज्यात इतक्या मोठ्या प्रमाणात मुली व महिला बेपत्ता होणे ही चिंताजनक बाब असून राज्य सरकारने विशेष पथक नेमून या महिला व मुलींचा शोध घ्यावा, अशा सूचना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी दिल्या आहेत.*

पुण्यनगरी मु. पा. नं. १

# महामार्गावर खैरतस्करी करणारा ट्रक जप्त

## ▪ भाताणे वनविभागाच्या कारवाईला यश

**▪ नालासोपारा :** मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील खैराची तस्करी करणाऱ्या ट्रकला ताब्यात घेऊन सामान वाहतुकीच्या आड होणारा लाखोंचा खैर लाकूड पकडण्यात भाताणे वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना यश आले. या प्रकारमुळे आंतरराज्य होणाऱ्या तस्करीचा पर्दाफाश झाला आहे. भाताणे वनविभाग मोबाइल स्कॉड गस्त घालत असताना महामार्गावरील सकवार भागात एक ट्रक मुंबई दिशेकडे संशयित पद्धतीत वेगाने दामटण्यात येत होता. त्यावरून ट्रकचा पाठलाग करून आपला जीव धोक्यात



घालून चालकासह ट्रक खानिवडे टोलनाक्यापूर्वी अडवण्यात आला.

प्लास्टिक ताडपत्रीने पूर्ण झाकलेल्या ट्रकची झाडाझडती घेतली. तेव्हा सुरुवातीला प्लास्टिक गोण्यांत चप्पल तयार करण्यासाठी लागणारा माल, या मालाशिवाय इतर माल असल्याचा कुठलाही संशय येणार नाही, असा भरलेला दिसला. मात्र कर्मचाऱ्यांनी माल काढून बाजूला सारून अधिक आतमध्ये तपास केला असता, त्यात खैर लाकूड दिसले. ज्याची बाजारात अंदाजे १४ लाख किंमत आहे. ट्रक गुजरात राज्यातून आला असून, तो पनवेलकडे जाणार होता, अशी प्राथमिक माहिती चालकांकडून मिळाली. यामुळे महामार्गावरून परराज्यातून खैरतस्करी होत असल्याचे उघड करण्यात भाताणे वनविभागाला यश आले आहे. चालकाला ट्रकसह ताब्यात घेण्यात आले आहे.



Scanned with CamScanner

लोकमत पान नं ४

पान नं ३

# उद्यानास टाळे लावल्याचे विचारल्याने मारहाण

## पोलिसांकडून चौघांवर गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोडच्या शांती नगरमधील उद्यानात चालण्यासाठी गेलेल्या तरुणाने प्रवेशद्वारास टाळे मारल्याचा जाब विचारला म्हणून चौघांनी मारहाण करत त्याच्या डोक्यात दगड मारल्याप्रकरणी नयानगर पोलिसांनी चौघांवर गुन्हा दाखल केला आहे.



मीरा रोडच्या शांती नगर सेक्टर ५ मध्ये राहणारे नमन सुनील झा (वय ३१) हे नेहमीप्रमाणे रविवारी चालण्यासाठी लगतच्या स्वामी विवेकानंद उद्यानात गेले होते. त्यावेळी एक लहान मुलगी शिटी वाजवत सर्वांना उद्यानाची वेळ संपली आहे, त्यामुळे सर्वांनी बाहेर चला असे सांगत फिरत होती. नमन व सोबतच्या अन्य एका व्यक्तीने उद्यान बंद व्हायला अजून १० मिनिटे असल्याचे मुलीला सांगितले. त्यावर मुलीने उद्यानाच्या प्रवेशद्वारास आतून टाळे लावले.

त्यावेळी मुलीसोबत असलेल्या सुनील कुमार पाठक (५०, रा. सेक्टर ७) यांना झा यांनी १० मिनिटे आधीच प्रवेशद्वार बंद केल्याबद्दल विचारणा केली. त्यावरून सुनील आणि सोबत असलेली पूजा अवशेष गिरी (३०, रा. सेक्टर ६) तिचा नवरा अवधेश, अशोक चंद्रा यांनी शिवीगाळ करत झा यांना ठोशा-बुक्क्यांनी मारहाण केली.

तसेच त्यांच्या डोक्यात दगड मारला. यामुळे ते जखमी झाले. याप्रकरणी नया नगर पोलिसांनी सुनील, पूजा, अवधेश व अशोकविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# बलात्कार पीडित महिला पोलिसावर एक वर्षानंतर ॲट्रॉसिटीचा गुन्हा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** बलात्कार पीडित महिला पोलिसावर आरोपी पोलिस कर्मचाऱ्याने दिलेल्या फिर्यादीवरून नयानगर पोलिसांनी ॲट्रॉसिटीचा गुन्हा एक वर्षांनी दाखल केला.

मीरा भाईंदर - वसई विरार पोलिस आयुक्तालयात कार्यरत महिला पोलिस कर्मचाऱ्याने पोलिस हवालदार प्रेमसागर वाघ याच्याविरुद्ध दिलेल्या तक्रारीनंतर नवघर पोलिसांनी बलात्कारासह विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला होता. वाघ हा गुन्हा दाखल झाल्यानंतर पसार झाला. तत्कालीन पोलिस आयुक्तांच्या निर्देशानंतर वाघ याला सेवेतून निलंबित करण्यात आले. दाखल गुन्हा रद्द करण्यासाठी वाघ याने मुंबई उच्च न्यायालयात याचिका केली आहे.

पोलिसांनी वाघ याची विभागीय चौकशी सुरू केली व चौकशी अधिकारी म्हणून नयानगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांना नेमले होते. २१ एप्रिल २०२२ रोजी चौकशीसाठी पीडित महिला पोलिस यांना नयानगर पोलिस ठाण्यात बोलावण्यात आले होते. त्यावेळी पीडित महिला पोलिसाने भांडण करून तुझ्या व तुझ्या मुलांविरुद्ध खोटा गुन्हा दाखल करेन, अशी धमकी दिल्याची अदखलपात्र तक्रार वाघ याने नोंदवली होती. त्यानंतर पीडितेने वाघ व मुलाविरुद्ध ई-मेलद्वारे तक्रार केली. पीडितेस आपण अनुसूचित जातीचे असल्याची माहिती असूनसुद्धा खोटी तक्रार केली. त्यांच्याकडून जीवितास धोका निर्माण करण्याची शक्यता असल्याची फिर्याद वाघ याने दिल्यानंतर ६ मे रोजी पीडितेवर ॲट्रॉसिटी कायद्याखाली गुन्हा दाखल करण्यात आला.



Scanned with CamScanner

पुण्यनगरी पृ. पा. क्रं. १

# तोडलेल्या बारचे बांधकाम पुन्हा सुरू

## ▌कोरोना काळातील कारवाई, सोसायटीकडून लेखी तक्रार

**▌मीरा रोड :** कोरोना महामारीच्या काळात परवानगी नसतानाही बेकायदा मानसी डान्स बार (अमर पॅलेस) चालू ठेवून नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी आयुक्त दिलीप ढोले व तत्कालीन पोलीस आयुक्त सदानंद दाते यांच्या आदेशानुसार, त्या बारवर तोडक कारवाई करून त्या ठिकाणी गटार व रस्ता बनवण्यात आला होता; परंतु दोन वर्षांनंतर पुन्हा त्याच ठिकाणी पत्रे लावून बेकायदा बांधकाम सुरू करण्यात आल्याची तक्रार मीरा को. ऑप. हाऊसिंग सोसायटीने आयुक्तांकडे करून बारवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.



काशिमीरा परिसरात मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या बेकायदा बांधकाम केलेल्या मानसी बारवर तोडक कारवाई करण्याचे आदेश तत्कालीन पालिका आयुक्त अच्युत हांगे यांनी २७ जुलै २०१६ रोजी १५ दिवसांच्या आत तोडून टाकण्याचे आदेश दिले होते. नंतर पालिका अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने बेकायदा बांधकामावर कारवाई करण्यात आली नव्हती, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

> ❝ या बारवर महापालिकेकडून दोन वर्षांपूर्वीच तोडक कारवाई करण्यात आली होती. मात्र आता त्याठिकाणी बेकायदा बांधकाम सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. तेथे लवकरच पोलीस बंदोबस्तात तोडक कारवाई करून गुन्हा दाखल करण्यात येईल.
>
> – मारुती गायकवाड, उपायुक्त, मीरा-भाईंदर महानगरपालिका

या ऑर्केस्ट्रा बारमध्ये मुली लपवण्यासाठी छुप्या पद्धतीने खोली तयार करून त्यात सहा मुली व एक तृतीयपंथी यांची सुटका करून चालक, मालक, मॅनेजर, वेटर अशा २१ जणांना अटक करण्यात आली होती. नंतर आयुक्त दिलीप ढोले यांच्याकडे तत्कालीन पोलीस आयुक्त सदानंद यांनी कारवाई करण्यासाठी पत्र दिले. पोलीस बंदोबस्तात १४ मे २०२१ रोजी त्या बेकायदा धंद्याचा अड्डा उद्‌ध्वस्त करत बार जमीनदोस्त करून त्याठिकाणी रस्ता व गटार तयार करण्यात आले होते. मात्र आता पुन्हा हाऊसिंग सोसायटीत बेकायदा बारचे बांधकाम सुरु करण्यात आल्याची लेखी तक्रार आयुक्त ढोले यांच्याकडे करण्यात आली आहे. यापूर्वीच बारचा परवाना पालिकेकडून रद्द करण्यात आला होता व राज्य उत्पादन शुल्क विभागाकडूनसुद्धा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सामना पा. नं. ८

# चिमुकल्याचा मृत्यू

**विरार :** दोन वर्षांच्या चिमुकल्याचा टेम्पोखाली चिरडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. अमरजीत हरिजन असे मृत चिमुकल्याचे नाव आहे. म्हशींसाठी चारा घेऊन आलेला टेम्पो रिव्हर्स घेत असताना टेम्पोचे चाक अंगणात झोपलेल्या अमरजीतच्या अंगावरून गेले. त्यानंतर गॅलक्सी रुग्णालयात उपचारासाठी नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.



Scanned with CamScanner

लोकमत

# दुसऱ्याने वापरलेली दुचाकी स्वस्तात घेताय तर व्हा सावधान!

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** शहरात दुचाकी चोरीचे सत्र सुरू आहे. त्यामुळे वाहनधारक चिंताग्रस्त झाले असून, दुचाकी पार्क करायची तरी कुठे, असा प्रश्न त्यांना पडला आहे. दरम्यान, चोरी केलेल्या दुचाकी चोरटे कवडीमोल किमतीत विकतात. त्यामुळे एखादी व्यक्ती दुचाकी बाजारभावापेक्षा कमी भावात देत असेल, तर ती चोरीची असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशी कमी किमतीत दुचाकी खरेदी करताना सावधान राहण्याची गरज निर्माण झाली आहे.

पोलिस आयुक्तालयातील कोणत्या ना कोणत्या पोलिस ठाण्याच्या हद्दीतून दुचाकी चोरीला जाण्याचे प्रकार नित्याचे झाले आहे. दुचाकी चोरीला आळा घालण्यासाठी पोलिस नाकाबंदी करत असून, कसून तपासणीही करतात. असे असतानाही दुचाकी चोरीच्या घटना थांबलेल्या नाहीत. त्यामुळे दुचाकी चोरांचे मोठे आव्हान पोलिसांसमोर उभे राहिले आहे.

## चार महिन्यांत १८६ दुचाकींची चोरी

पोलिस आयुक्तालयात १ जानेवारी ते ३१ मार्च या तीन महिन्यांच्या कालावधीत १८६ दुचाकी चोरीला गेल्या आहेत. त्याबाबत पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ९० दिवसांत १८६ दुचाकी चोरीला जाणे, पोलिसांसाठी आव्हानात्मक आहे.

## सापडल्या केवळ ७८

पोलिस आयुक्तालय हद्दीतील सोळा पोलिस ठाण्यांत वाहन चोरीचे १८६ गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी केवळ ७८ दुचाकी पोलिस हस्तगत करू शकले आहेत.



## दोन दिवस तक्रार घेतली जात नाही

तुम्हीच कुठे विसरला असाल, कुणी ओळखीतील व्यक्ती घेऊन गेली असेल, कुणी गंमत केली असेल, अशी पळवाट काढून काही ठाण्यांत दोन दिवस तक्रारच घेतली जात नाही.

## वापरलेली दुचाकी घेताना काय काळजी घ्याल?

वापरलेली गाडी घेताना केवळ स्वस्त मिळाली अथवा चांगली दिसते यावरून खरेदी करू नये. आरसी बुक, विमा पॉलिसी, पीयूसी या सर्व कागदपत्रांची वैधता तपासून घ्यावी. कागदपत्रावर दुचाकीचा रंग कोणता आहे. दुचाकीवर एखाद्या बँकेचा, संस्थेचा किंवा अन्य कंपनीचा लोन किंवा बोजा आहे का, हे तपासावे.

## काय होते चोरीच्या दुचाकीचे?

**पार्ट्स काढून विकले जातात :** काही चोर चोरलेल्या दुचाकींचे सुटे भाग काढून ते विकतात. ते भाग घेणारी मंडळीदेखील शहरात आहेत. त्यामुळे पकडले जाण्याचा धोका कमी असतो.




**स्वस्तात ग्रामीण भागात विकली जाते :** ग्रामीण भागात चोरीच्या दुचाकी बाजारापेक्षा कमी दराने विकल्या जातात. आपल्याला गावातच तर चालवायची आहे, असा विचार करून ते कागदपत्रे मागत नाहीत.

**भंगारमध्ये विकली जाते :** कमी किमतीत का होईना, मात्र तसा ग्राहक शोधण्यात वेळ जातो, तर सुटे भाग काढण्यातही रिस्क असते. त्यामुळे चोरीच्या अनेक दुचाकी थेट भंगारमध्ये विकल्या जातात.

> कमी किमतीत मिळणारी दुचाकी चोरीची असू शकते. दुचाकी चोरट्यांबद्दल काही माहिती असल्यास नागरिकांनी स्थानिक पोलिसांशी संपर्क साधावा.
>
> \- पोलिस प्रशासन



Scanned with CamScanner